**निशाणी क्र. ३१ लगत**

**फिर्यादी तर्फे साक्षीदार क्र.१ गोपाळ गणपती ढगे यांचा जादा सरतपास त्यांचे विधिज्ञ श्री. बी.जी.जगळपुरे यांच्यामार्फत शपथेवर सुरू.**

८. आता मला निशाणी क्र.३६ अनु.क्र.१ वरील धनादेश दाखविला. सदरचा धनादेश आरोपीने मला दिलेला असून त्यावरील मजकूर खरा व बरोबर आहे. त्या धनादेशावर आरोपीची सही आहे. ती मी ओळखतो. त्या धनादेशास **नि.क्र.३७** देण्यात येते. आता मला निशाणी क्र.०३ अनु.क्र.२ वरील बँकेचा मेमो दाखविला. तो मेमो धनादेश अनादर झाल्याबाबतचा आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३८** देण्यात येते.

९. आता मला नि.क्र.३ अनु.क्र.३ वरील नोटीस दाखविली. सदरची नोटीस मी माझे वकिलांमार्फत आरोपीला पाठविलेल्या नोटीसीची स्थळ प्रत आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी व माझ्या वकिलांची सही आहे. त्यास **नि.क्र.३९** देण्यात येते. आता मला नि.क्र.३ अनु.क्र.४ वरील पोस्टाची पावती दाखविली. सदर पावती आरोपीला नोटीस पाठविल्याबाबतची आहे. त्यास **नि.क्र.४०** देण्यात येते. आता मला नि.क्र.३ अनु.क्र.५ वरील लखोटा दाखविला. सदर लखोटा हा मी पाठविलेली नोटीस आरोपीने न स्वीकारल्याने तो मला परत मिळाला. त्या लखोट्यास **नि.क्र.४१** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपीतर्फे विधीज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृती

स्वाक्षरीत/-

उदगीर
दिनांकः १९/०६/२०२६

**(के. ए. यादव)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, उदगीर
(न्यायालय क्र.३)